Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# मसणजोगी समाजाची गतकालीन स्थिती व सद्य स्थिती

**प्रकाश भागीनाथ बच्छाव**
संशोधक विद्यार्थी

**डॉ. शिवाजी अंभोरे**
विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

भारतात अनेक भटक्या जमाती ह्या अनादी काळापासून राहत आहेत. भटकंतीमुळे त्यांच्या वाट्याला खडतर जीवन आलेले आहे. आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी भटकंती करणे, भटकंती करताना लोक संस्कृती जपणे आणि लोकांच्या उपयोगी पडणे असे जीवन भटक्या समाजाच्या वाट्याला आलेले आहे. या पैकीच मसणजोगी ही भटकी जमात म्हणून ओळखली जाते. या जमातीमधील लोकांच्या वाट्याला भटकंती जीवन आणि मसणभूमी तील जीवन आलेले आहे. हे लोक नेहमीच दुस-याच्या उपयोगी आहेत. प्रेतांवर अंतिम संस्कार करतांना इतर लोकांना त्यांची मदत होते. म्हणून लोकसंस्कृती टिकविण्याचे महान कार्य हे लोक पूर्वीपासूनच करीत आलेले आहेत. या जमातीतील लोक भारतभर विखुरलेले आढळून येतात. यांची लोकसंख्या ही अल्पप्रमाणात आहे. पूर्वीपासूनच हे लोक मसणभूमीत राहून आपले पोट भरत आलेले आहेत. आंध्रप्रदेशातून आलेले हे लोक महाराष्ट्रात आजही भटकत आहे. खडतर जीवन त्यांच्या वाट्याला आलेले आहे. काही लोक मसणभूमीच्या आश्रयाला राहून लोकोपयोगी कार्य करतात. काही भिक्षा मागत गोवोगाव हिंडतात. प्राचीन काळापासून आजपर्यंत आपला पारंपारिक व्यवसाय जतन करण्याकडे या लोकांचा कल आढळतो.

प्राचीन काळापासून स्मशानभूमीत राहण्याची परंपरा मसणजोगी पार पाडत आहेत. पूर्वी त्यांना कापामिक असे नाव होते. याबद्दल प्रभाकर मांडे म्हणतात, ‘‘कापालिकाचा प्राचीनतम उल्लेख मैत्री उपनिषदात आढळतो. त्या ठिकाणी ते तस्कर असून त्यांच्या सहवासात कोणी राहू नये असे सुचविले आहे. पुराणात कापालिकांची वर्णने असुन त्यांच्या मत प्रणालीची चर्चा

आढळते. कालामूख हा कापालिकांचा पुढारलेला वर्ग असून शिवपुराणात त्यांना महाव्रतधर असे म्हटले. आहे. कापालिका हे माला, अलंकार, कुंडल, चुडामणी, भस्म आणि यज्ञोपवीत या सहा वस्तू धारण करतात. त्यांच्या दृष्टीने या सहा मुद्रा होत. या सहा मुद्रांचे रहस्य समजले की साधकाला महासुखाची प्राप्ती होते. आणि निर्वाण प्राप्ती होते अशी त्यांची दृढ श्रध्दा असते. हठयोगच्या साधनेमुळे त्यांना रिध्दी सिध्दी प्राप्त होते अशी त्यांची श्रध्दा आहे. महाराष्ट्रात भटकणारे स्मशान जोगी हे संसारी झालेले कापालिक असावेत?'' मसण जोगी यांच्या या गतकालीन स्थितीवरून भगवान शिवानंतर त्यांचा वारसा या समाजातील शिवसंप्रदायातील लोक चालवितात असे म्हणता येईल. भगवान शंकराप्रमाणे हे स्मशान भूमीत राहत होते. त्यानंतर ही परंपरा कायम राखली असेही लक्षात येते. हे लोक भगवान शिव यांचा आदर्श घेऊन जीवन जगत आहेत. भगवान शिव यांच्या पासून ही परंपरा सुरु झाली असावी असेही येथे म्हणता येते. स्मशानभूमीत राहून त्यांना पोट भरता येत नाही म्हणून त्यांना भिक्षा मागावी लागते असेही इथे म्हणता येते.

मसणजोगी ही भटकंती करणारी जमात पूर्वीपासून आहे. आज त्यांच्या जीवनात फारसा फरक पडला असे म्हणता येणार नाही. परंतु काळाचा ओघात या जमातीत थोडेफार बदल निश्चितच झालेले आहेत. मसणजोगी समाजाच्या सद्यःस्थिती बाबत प्रा.रामनाथ चव्हाण म्हणतात, 'पिढ्यान पिढ्या स्मशानात राहणारा आणि प्रस्थापितांकडून दुलक्षित असलेला हा समाज गेल्या काही वर्षापासून बदलत्या काळानुसार अंतरबाह्य बदलत असलेला दिसतो.

गेल्या पंधरा वर्षापासून या जमातीने आपल्या जगण्यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल केल्याचे आढळते. विशेषतः उपजिवीकेसाठी सतत भटकणारा हा समाज गावोगावी स्थिर होतांना दिसतो. स्वतःचे स्वतंत्र व्यवसाय उभे करून तो जगत आहे. भंगार गोळा करणे, चस्मे आणि कॅलेंडर फेरीला जाऊन विकणे, मोठ्या व्यापा-याकडून (प्लॅस्टिकलच्या वस्तू खरेदी करून किरकोळ स्वरूपात घरोघरी जाऊन विकणे असे काही छोटे-मोठे व्यवसाय करून मसणजोगी जगत आहे. या शिवाय जमातीची परंपरा राखणारे मसणजोगी स्मशानभूमीत

मर्तिकाचे क्रीयाक्रम करतात. समाजाची संख्या तुलनेने अतिशय कमी आहे. पूर्वी पासूनच हे लोक स्मशानातच राहत होते. ते आता गावाच्या शेजारी कच्ची घरी बांधून राहताना आढळतात. काहींना गावाच्या ग्रामपंचायती मार्फत किंवा शहरात महानगरपालिकेच्या नोकरीत त्यांना सामावून घेतलेले आहे. विशेषतः जमातीतील ६० वर्ष वय ओलांडलेली काही माणसे अद्यापही पूर्वीप्रमाणेच वेष परिधान करून गावात भिक्षा मागतात, शंख वाजवितांना दिसतात. पण अशा लोकांची संख्या खूप कमी आहे.' मसनजोगी समाजातील वृध्द लोक सोडले तर तरुण मुलांनी आपल्या जीवन शैलीत खुप बदल केलेले आहेत. त्यांनी नव नवीन व्यवसायाला सुरवात केलेली आहे. वेगवेगळ्या ठिकाणी ती कामे करून आपले जीवनमान बदलवत आहेत. पूर्वीप्रमाणे स्मशानभूमीत काम करायला नवतरुण तयार नाहीत. स्वतःचा छोटा मोठा व्यवसाय करण्याकडेच त्यांची ओढ आहे.

पिढ्यान पिढ्या आपल्या जाती-जमातीच्या लोकांची उपेक्षा झालेली आहे. त्यामुळे अत्यंत हीन दर्जाचे जीवन जगण्यासाठी ते तयार नाहीत. भारतीय समाज व्यवस्थाच आपल्या उपेक्षित जीवनाला कारणीभूत आहे याची जाणीव मसणजोगी समाजातील आधुनिक पिढीला झालेली आहे. शिक्षणाशिवाय जीवनात प्रगती नाही याचे महत्व समाजातील तरुणांना पटलेले आहे. मसणजोगी समाजात पूर्वी जात पंचायतीचे प्रस्थ होते. आता त्यांचे अस्तित्व हळूहळू कमी होत चालले आहे. जात पंचायतीचा समाजात धाक राहीलेला नाही. भारत सरकारने भटक्या जाती - जमाती कायद्याने बंद केल्याने शक्यती जात पंचायत भरत नाही. गावागावातील भांडण तंटामुक्ती समितीव्दारे सोडविण्याकडे त्यांचा कल दिसतो. जर जातपंचायत भरवून अन्याय झालाच तर पोलिसांकडे दाद मागता येते याची जाणीव मसणजोगी समाजाला झालेली आहे.

पूर्वी एकाकीपणाने गावोगाव भटकणारा हा समाज हळूहळू संघटीत होऊ लागला आहे. यासाठी मसणजोगी जमाती मधील सुशिक्षित नवतरुण पुढे येत आहेत. मसणजोगी समाजातील काही लोकांना धर्मांतरासारखा मार्ग स्वीकारलेला आहे. हिंदू धर्म सोडून बौध्द धर्मात अनेकांनी

स्थलांतर केलेले आहे. भटक्या समाजातील नेते आणि कार्यकर्त्यांचा प्रभाव ही समाजावर पडत आहे. अहमदनगर जिल्हयातील शेवगाव तालुक्यातील अनेक लोकांनी बौध्द धर्माचा स्वीकार केलेला दिसतो. २००७ मध्ये मुंबई येथे जाऊन त्यांनी धर्म स्विकारला. याबद्दल प्रा. रामनाथ चव्हाण म्हणतात, शेवगाव येथील सुमारे चारशे कुटुंबातील लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपला उध्दारक मानून २७ मे २००७ रोजी मुंबईच्या बेसकोर्स मैदानावर लाखो लोकांच्या उपस्थितीत बौध्द धम्म दिक्षा घेतली आणि आमचा आता नवा जन्म झाला, यापुढे आम्ही माणुस म्हणून जगू अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. लक्ष्मण माने यांच्या बरोबर बौद्ध धर्माचा स्वीकार केलेल्या या जमातीमध्ये आता माणुस म्हणून जगण्याची हिंमत निर्माण झालेली आहे. आजवर ज्या देवदेवतांच्या भरोशावर लाचारपणाचे जीवन आणि जगणे वाट्याला आले, अनेक पिढ्यांच्या जगण्याची फरफट ज्या जाती व्यवस्थमुळे झाली, हिंदू समाजामुळे आमच्या वाट्याला दुःख आले तिच अवस्था आता आम्ही नाकारली. देवदेवतांचे पिढ्यान पिढ्यांचे डोक्यावरचे ओझे बौध्द बौध्द धम्म स्वीकारून खाली उतरले, अशी भावना मुलाखतीच्या वेळी मसणजोगी जमाती मधल्या अनेकांनी प्रांजळपणे व्यक्त केली.’’[३] या स्पष्टीकरणांवरून असे म्हणता येते की, मसणजोगी समाज काळानुसार बदलत आहे. धर्मांतरामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या विचार सरणीचा फायदा त्यांना जीवनात होत आहे. दि.१२/३/२०१९ रोजी शेवगाव येथील मसणजोगी समाजातील वस्तीस भेट दिली असता तेथील लोकांनी आमचे स्वागत ‘जयभीम’ म्हणून केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार सरणीचा आणि कृतीचा या समाजावर प्रभाव पडत आहे असेही आढळून आले.

मसणजोगी समाज काळानुसार बदलत आहे. भटकंती करणारा समाज आज काही अंशी स्थिर होत आहे. काहीतरी व्यवसाय करून तो जगण्यासाठी धडपड करीत आहे. मसणजोगी समाजाच्या सथःस्थिती बदल डॉ. धोंडीराम वाडकर म्हणतात, मसणजोगी समाजात पारंपरिक व्यवसाय करणारे लोक आजही आहेत. परंतु व्यवसाय करून काही प्रमाणात लोक स्थिर होत

आहेत. या जमाती मधील वयोवृद्ध लोक आजही भिक्षा मागतात. समाजात जात पंचायत पूर्वी इतकी प्रभावी दिसत नाही. म्हणून काळानुसार या समाजात बदल होत आहे.

मसणजोगी समाजातील सद्यस्थिती पाहता असे लक्षात येते की त्यांची भटकती पूर्णपणे थांबलेली नाही ती काही अंशी कमी झालेली आहे. शिक्षणाच्या प्रवाहात हे लोक येत आहेत परंतु उच्च शिक्षण घेणारे आणि शासकीय नोकरीत प्रवेश करणारे लोक अतिशय कमी आहेत असेही संशोधनातून आपल्या समोर येते. व्यथा, वेदना, जीवन आजही काही लोकांच्या नशीबी आहे. आज आधुनिक काळात ही मसणजोगी समाजात शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच तरूण शिक्षण घेत आहेत. शिक्षण घेऊन ही नोकरीसाठी संघर्ष हा ठरलेलाच आहे. यांचे ज्वलंत उदाहरण म्हणजे दत्ता पवार यांचे आत्मकथन होय. त्यांनी बी.ए. बीएड करून सुध्दा नोकरी मिळाली नाही. मिळालेली नोकरी त्यांना सोडावी लागली. अनेक ठिकाणी काम करून शेवटी मसणवट्यात काम करावे लागले ही शोकांतिका समोर येते.

मसणजोगी समाजात धर्माचा जबरदस्त पगडा आहे. प्रचंड व्यसनाधिनाही या समाजात आढळते. शिक्षण नाही, काम नाही, भिक्षा मागावी लागत असल्याने हे लोक अधिक अंधश्रध्देच्या आहारी जातात. म्हणून आजमितीला या समाजाला आत्मभान येणे गरजेचे आहे. त्यात शासनाने जर त्यांना मदतीचा हात दिला तर या समाजाची उन्नती निश्चित होणार यात शंका नाही असे ही अभ्यासाने आपल्यासमोर मांडता येते. मसणजोगी समाजातील सद्यःस्थिती बद्दल डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, ‘मसणजोगी अजूनही खऱ्या अर्थाने स्थिरावलेले नाही. त्यांना आपल्या मुलांना शिकवावे असे वाटत असले तरी नाईलाजाने आपले पारंपरिक रंगबेरंगी, चमत्कारीक वेश घालून भिक्षा मागणे थांबलेले नाही. राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष त्यांच्याकडे केवळ आश्वासन देणे, बहुरंगी दिसावा म्हणून त्यांना मोर्चात सहभागी करणे यापलीकडे गेले आहे असे दिसत नाही. ते असहाय आहेत, मार्गदर्शनासाठी, मदतीसाठी कुणीही आला तर याचना करतात. त्यांच्यात कुणी नेता नाही, कुणी त्यांचे खऱ्या अर्थाने नेतृत्व करीत नाही अशी

एकूण अवस्था आहे. समाजात त्यांच्या विषयी कुतूहल आहे, अनेक गैरसमजही आहेत. हे सगळे थांबविण्यासाठी त्यांच्या मुलाना सक्तीने शाळेत दाखल केले पाहिजे. विधायक भूमिकेने त्यांच्याशी संपर्क साधला पाहीजे. त्यांना काम करण्याची संधी दिली पाहीजे, काम करण्यास भाग पाडले पाहीजे. मसणजोग्याचे आर्थिक, शैक्षणिक प्रश्न समजावून त्यांना सामाजिक प्रगतीमध्ये सहभागी करून घेणे ही काळाची गरज आहे असेच प्रभाकर मांडे यांच्या मतावरुन आपल्या लक्षात येते.

मसणजोगी समाजातील भटकेपण आजही कायम आहे. त्यांची शैक्षणिक प्रगती, सामाजिक प्रगती, राजकीय प्रगती आणि आर्थिक प्रगती आजही झालेली नाही. संस्कृतीने सधन असलेला हा समाज कायम उपेक्षित पणाचे जीवन जगत आलेला आहे. त्यांच्या जीवनात बदल होणे हे अपेक्षीत आहे. आज एकविसाव्या शतकात आपण बलशाली भारत बनण्याचे स्वप्न पाहात आहोत. हे स्वप्न सत्यात उतरवयाचे असेल तर भारतातील भटक्या जमातीचा विकास होणे अपेक्षित आहे. समाज उन्नतीमध्ये या उपेक्षित भटक्या जमाती मधील मसणजोगी समाजाचा विकास होणे ही काळाची गरज आहे, हेच या अभ्यासातून आपल्या समोर मांडणे उचित ठरणार आहे.

**संदर्भ**

१) मांडे प्रभाकर, 'गावगाड्याबाहेर', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९८३, पृ.१९५.

२) चव्हाण रामनाथ, 'भटक्या विमुक्तांची जात पंचायत' खंड ४, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, पहीली आवृत्ती २००८, पृ. १०७

३) तत्रैव- प्र.क्र. १०९

४) वाडकर, धोंडीराम, 'मसनजोग्यांचे लोकजीवन', कल्याणी प्रकाशन, अहमदनगर, प्रथमावृत्ती - २०१५, प्र.क्र.५३